# सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ

(पूर्वीचे पुणे विद्यापीठ)

**परिपत्रक क्रमांक : १९७/२०१८**

**"त्यागमुर्ती श्रीमती सरस्वती रामचंद्र शेलार सुवर्णपदक २०१८–१९"**

**विज्ञान व तंत्रज्ञान विद्याशाखेव्यतिरिक्त (पदव्युत्तर अभ्यासक्रमाकरीता)**

सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ संलग्नित महाविद्यालय/विद्यापीठ विभागातील विज्ञान विद्याशाखा आणि विज्ञानेतर विद्याशाखेतील पदव्युत्तर अभ्यासक्रम पूर्ण केलेल्या **विद्यार्थीनीस** दरवर्षी आलटून–पालटून **"त्यागमुर्ती श्रीमती सरस्वती रामचंद्र शेलार सुवर्णपदक"** प्रदान करण्यात येते. **सन २०१७–१८ मध्ये विज्ञान व तंत्रज्ञान विद्याशाखेव्यतिरिक्त** पदव्युत्तर अभ्यासक्रमातील सर्वोत्कृष्ट विद्यार्थीनीस विद्यापीठाच्या पदवी प्रदान समारंभात हे सुवर्णपदक प्रदान करण्यात येणार आहे.

या परिपत्रकाद्वारे सर्व विद्यापीठ विभागप्रमुख/प्राचार्य/संचालक यांना कळविण्यात येते की, **"त्यागमुर्ती श्रीमती सरस्वती रामचंद्र शेलार सुवर्णपदक"** साठी खाली उल्लेख केलेल्या नियम व अटी नुसार विद्यार्थीनीची माहिती आवश्यक कागदपत्रे व शिफारशीसह **दि. १५/११/२०१८** पूर्वी **शैक्षणिक प्रवेश विभाग, सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ** येथे प्रत्यक्ष (हस्तपोच) अर्ज सादर करावे. तसेच मागील वर्षी ज्या विद्यार्थीनीने सदर सुवर्णपदकासाठी अर्ज सादर केलेले असतील अशा विद्यार्थीनीने पुन्हा अर्ज सादर करू नयेत. मुदतीनंतर प्राप्त झालेल्या अर्जाचा विचार केला जाणार नाही याची कृपया नोंद घ्यावी.

**<u>नियम व अटी</u>**

१. सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ कार्यक्षेत्रातील पदव्युत्तर अभ्यासक्रम पुर्ण केलेल्या सर्वोत्कृष्ट विद्यार्थीनीस हे सुवर्णपदक प्रदान करण्यात येईल.

२. विद्यार्थीनी इयत्ता दहावी, बारावी, पदवी व पदव्युत्तर परीक्षेत उत्तम गुणाने उत्तीर्ण झालेली असावी.

३. विद्यार्थीनी भारतीय संस्कृती, आचार विचार, भारतीय परंपरा मानणारी व त्याचे स्वत:च्या दैनदिन जीवनात आचरण करणारी असावी.

४. विद्यार्थीनीने जास्तीत जास्त प्रकारच्या खेळांमध्ये भाग घेतलेला असावा. अशा विद्यार्थीनीस प्राधान्य देण्यात येईल.

५. गायन, नृत्य, वक्तृत्व, नाटय व इतर कलागुणांपैकी जास्तीत जास्त प्रकारामध्ये सहभाग असावा. विद्यार्थीनी होतकरू व हरहुन्नरी व्यक्तिमत्वाची असावी.

६. रक्तदान, श्रमदान, पर्यावरण रक्षण व प्रदुषण नियंत्रण कार्य, साक्षरता व स्वच्छता मोहिम तसेच आरोग्यविषयक जनजागरण मोहिम इ. मध्ये सहभाग असावा.

७. पदव्युत्तर अभ्यासक्रमातील पात्र विद्यार्थीनी उपलब्ध नसल्यास पदवी अभ्यासक्रमाच्या विद्यार्थीनीचा सुवर्णपदकासाठी विचार करण्यात येईल.

८. सुवर्णपदकास पात्र असणाऱ्या विद्यार्थीनीस अध्यादेश क्र. १०९, ११० व १४३ ची पूर्तता करणे आवश्यक आहे.

९. अध्यादेश क्र. १६८ नुसार परीक्षेस बसणारी विद्यार्थीनी सुवर्णपदकास पात्र ठरणार नाही.

गणेशखिंड,पुणे–७ )
संदर्भ:–शै.प्रवेश/४४७९ )
दिनांक: २६/१०/२०१८ )

उपकुलसचिव
शैक्षणिक प्रवेश विभाग

Destock/Ramesh/SelarMama